स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

E:\Suraksha Document Comp 1\2025-2026\LETTER\Stall Holgadi Prasidhi Patrak.Docx 1

जा.क्र.विकसन/सुरक्षा/स्टॉल/वर्ग/नावात/बदल/ २४२१ /२०२५-२०२६ दिनांक ३ /०१/२०२६

**प्रसिध्दी पत्रक**

मा. प्रशासक मंडळ सभा दिनांक ६/१०/२०१७ ठराव क्र. ११ (२७) अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारातील फळे भाजीपाला विभागामध्ये गाळा क्र. १०६ शेजारी ६ X ६ उंची ८ फुट आकारमानाची पानटपरीसाठी श्री. अविनाश बाजीराव जगताप यांना दिनांक २९/११/२०१७ ने स्टॉल लावणेस परवानगी देणेत आलेली आहे. तरी श्री. अविनाश बाजीराव जगताप यांचा स्टॉल वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यामुळे फळे भाजीपाला विभागातुन गुळ भुसार विभागामध्ये स्थलांतरीत करणेत आलेला आहे.

सद्यस्थितीत श्री. अविनाश बाजीराव जगताप यांनी सदर स्टॉल श्री. महेश सुभाष भोंडवे यांच्या नावावर वर्ग केलेला असुन सदर स्टॉलचे बाजार समितीच्या दप्तरी स्टॉलच्या नावात बदल करणेसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह बाजार समितीकडे दिनांक १२/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अर्ज केलेला आहे.

त्यानुसार मा. संचालक मंडळ सभा दिनांक १२/१२/२०२५ ठराव क्र. ६ (५१) मध्ये " श्री. अविनाश बाजीराव जगताप यांचे नावावरील स्टॉल श्री. महेश सुभाष भोंडवे यांचे नावावर वर्ग करणेस मंजूरी देणेत येत आहे" असा निर्णय घेणेत आलेला आहे.

तेव्हा कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारातील गुळ भुसार विभागातील श्री. अविनाश बाजीराव जगताप यांचे नावावरील स्टॉल श्री. महेश सुभाष भोंडवे यांचे नावावर वर्ग करून सदर स्टॉलच्या नावात बदल करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. ८ दिनांक १६/१२/२०२२ अन्वये कोणाची काही तक्रार/ हरकत असल्यास, ती दिनांक १५/०१/२०२६ पावेतो बाजार समितीच्या मुख्य कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/ हरकत विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मा. सभापती साहेब यांच्या मान्यतेने**

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७